# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

प्रेसनोट

## पीएमपीएमएल कडून १० वी व १२ वी परीक्षेला सामोरे जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी बस प्रवासासाठी विविध सुविधा

दि. २१/०२/२०२४ ते दि. १९/०३/२०२४ दरम्यान उच्च माध्यमिक (१२वी-एच.एस.सी.) व दि. ०१/०३/२०२४ ते दि. २६/०३/२०२४ दरम्यान माध्यमिक शालांत (१०वी-एस.एस.सी.) परीक्षा होणार आहेत. परीक्षा कालावधी दरम्यान १० वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांच्या सोयीकरीता पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या वतीने खालीलप्रमाणे सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

१) परीक्षा कालावधीमध्ये बसपासधारक विद्यार्थ्यांचे बसपास त्यांचे निवासस्थान आणि परीक्षा केंद्र या दरम्यान वैध मानण्यात येतील. सदर विद्यार्थ्यांना वेगळे प्रवासी तिकीट घ्यावे लागणार नाही.

२) परीक्षा कालावधीमध्ये परीक्षार्थी विद्यार्थ्यांना बसमध्ये पुढील दरवाजातून प्रवेशाची मुभा राहील.

३) परीक्षार्थी विद्यार्थ्यांना प्राधान्याने बससेवा उपलब्ध व्हावी याकरीता गर्दीच्या बसथांब्यांवर अधिकारी / पर्यवेक्षकीय सेवकांची नियुक्ती करण्यात येणार आहे. तसेच शालेय व्यवस्थापनाकडून सूचना आल्यास अतिरिक्त बसेसचे देखील नियोजन करण्यात येणार आहे.

तरी इ. १० वी व इ. १२ वी चे सर्व परीक्षार्थी व त्यांच्या पालकांनी पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून उपलब्ध करून देण्यात आलेल्या बसप्रवासाच्या सुविधांची नोंद घ्यावी व या सुविधेचा जास्तीत जास्त परीक्षार्थींनी लाभ घ्यावा असे आवाहन परिवहन महामंडळाकडून करण्यात येत आहे.

Sd/-<br>
चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन)<br>
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

दि. १९/०२/२०२४

मा. संपादक,<br>
दैनिक ..........<br>
यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.

मा. स. कळावे.

sd/-<br>
कामगार व जनता संपर्क अधिकारी<br>
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---